CIDCO
WE MAKE CITIES

सकाळ मुंबई, बुधवार, ४ जून २०२५

# तळोजा विकासाचे केंद्र : सिंघल

## दळणवळणाच्या सुविधांवर सिडकोकडून विशेष भर

नवी मुंबई, ता. ३ : दक्षिण नवी मुंबईतील वेगाने विकसित होणाऱ्या तळोजा (खारघर पूर्व) नोडमध्ये सिडकोतर्फे दळणवळणाच्या सुविधांवर भर दिला जात आहे. खारघर, पनवेल, कल्याण आणि डोंबिवली अशा शहरांना जोडणाऱ्या दळणवळणाच्या सुविधांबरोबर कल्याण मेट्रो आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या मेट्रोमुळे मोठे उदयोन्मुख केंद्रामुळे भविष्यात तळोज्यातील घरांच्या किमती गगनाला भिडणार आहेत.

तळोज्यातील रस्ते, पूल, सार्वजनिक सुविधा आणि नवी मुंबई मेट्रोसह पायाभूत सुविधांमध्ये सिडको मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करीत आहे. आगामी मुंबई मेट्रो लाइन १२ ही कल्याण- डोंबिवली- तळोजा मेट्रो मार्ग कल्याण ते तळोजा शहरांना जोडणार आहे. यामुळे प्रवासाचा वेळ ४५ मिनिटांनी कमी होणार आहे. त्याचबरोबर तळोजा नोडसाठी मुंबई मेट्रो लाइन १२ अतिशय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

### ➔ दोन पूल पूर्णत्वाच्या मार्गावर

पेंधर आरओबी आणि तळोजा नदी पूल हे दोन प्रमुख पूल पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. पेंधर आरओबीमध्ये पादचाऱ्यांसाठी ओव्हर ब्रिज आहे. तर खारघर आणि तळोजा दिशेकडील दोन्ही मार्गासह तळोजा नदी पुलाचे बांधकाम सुरू आहे. तळोजा दिशेचा मार्ग पूर्ण झाल्यानंतर, पेंधर आरओबी वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे. यामुळे वाहनांना राष्ट्रीय महामार्ग चारला थेट प्रवेश मिळणार आहे.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील तळोजा नोडचे धोरणात्मक स्थान त्याच्या विकासात क्रांती घडवून आणण्यास सज्ज आहे. तळोजा ते सीबीडी बेलापूरला जोडणारी नवी मुंबई मेट्रो लाइन एक जीवनरेखा म्हणून प्रस्थापित झाली आहे. शिवाय, खारघर-तळोजा पूल प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होणार असून राहणीमानाचा दर्जदेखील वाढणार आहे.

- विजय सिंघल, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, सिडको

@CIDCO_LTD | @CIDCO_LTD | @cidco_ltd | @cidco_ltd